# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे


या अंकात


पान ०३ आस पास

पान ०५ घरातील ॲप्लिकेशन्सचे सुसूत्रीकरण ही काळाची गरज

पान ०५ देशो देशी

पान ०६ share बाजार आणि financial मार्केट




*Young Turks of Parle*
पान ४


वर्ष ३० वे अंक पहिला पृष्ठे ०७ जानेवारी २०२१ www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


## नवे वर्ष, नवी स्वप्ने, नवे संकल्प



२०२१. नवीन वर्ष,'आम्ही पार्लेकर' च्या सर्व वाचकांना व सुहृदांना नववर्ष भरभराटीचे, आनंदाचे व मुख्य म्हणजे आरोग्यदायी जावो. हीच आम्हा सर्वांची मन:पूर्वक कामना.

२०२० या वर्षाने संपूर्ण जगावर भीतीचे, निराशेचे सावट आणले. कोरोना नामक विषाणूने जसे काही सर्व जगास गिळून टाकले. उद्योगधंद्यांची पार नासाडी होतानाच पण माणसामाणसातील अंतरही वाढले. शाळा,ऑफिस बंद आणि सर्व माणसे घरातच नजरकैदेत अशी विचित्र अवस्था झाली. पण या भीषण काळातही पोलिस, आरोग्यसेवक, स्वच्छता कामगार आणि समाजिक कार्यकर्ते स्वत:चा जीव पणाला लावून झटले.

आपल्या पार्ल्यात तर सर्व समाजसेवी संघटनांनी व कार्यकर्त्यांनी अवर्णनीय असे कार्य केले.

या सर्वांच्या मेहनतीचे फळ म्हणजेच आज संपूर्ण पार्ले बहुतांशी प्रमाणात कोरोना मुक्त झाले आहे. जगातील अनेक विकसित देशांतील या वर्षात झालेली भयंकर स्थिती बघता भारतासारख्या विकसनशील व प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाने स्वत:ला ह्या खाईत जाण्यापासून वाचवले असेच म्हणावे लागेल.

आता परिस्थिती निवळते आहे. उद्योग पूर्वपदावर येऊ लागलेत. स्थलांतरित कामगारही पुन्हा आपल्या कामावर परतू लागले आहेत. लॉक डाऊन करून सरकारने ज्या जनसामान्यांचे प्राण वाचवले, आता तेच हात दुप्पट जोमाने आपली अर्थव्यवस्था पुनश्च उंचावत नेतील व अमेरिका, युरोपात झालेल्या नव्या कोरोना लाटेला आपण आपली एकसंध फळी उभारून आपल्या देशात पाऊल टाकू देणार नाही असा विश्वास आम्हाला वाटतो.

गेले अनेक महिने आपण ज्याची चातकाप्रमाणे वाट बघत होतो ती कोरोनाची लस आता उपलब्ध झाली आहे. १६ जानेवारीपासून देशभरात लसीकरणाची मोहीम सुरू होत असून कोरोनाविरुद्धच्या ह्या अंतीम लढाईसाठी सर्व देश सज्ज झाला आहे. कोरोनाची काळरात्र संपून नवीन वर्षाची पहाट होत आहे, नव्या आकांक्षा, नवी स्वप्ने घेउन. ■




Green house RESTAURANT & BAR

KOLHAPURI PAHUNCHAR

Relish a thaali full of Traditional Kolhapuri Cuisine.

Made by Kolhapuri Cuisine Expert Chef

Loaded Full-Course Thaalis

Pure Veg & Non Veg Options available

Packed in Heat-n-eat Microwavable Plates

Prepared with utmost hygiene & care

Large Thaalis

Mutton @ Rs. 700
Chicken @ Rs. 600
Pure Veg @ Rs. 400
Sea Food @ APC

VISIT NOW!

022 26102593
022 26151104

12 pm-12 am

Premises sanitized with German Liquid-tech

Rao Apts., Nehru Road, Vile Parle East - 400057

★ SPECIAL OFFER ★ Green house

Complimentary Wine Glass / Draught Beer With every Thaali

Dine with delightful discounts



आमची कुठेही शाखा नाही

साठे यांचे **विजय स्टोअर्स**

सहजीवन, ४, श्रध्दानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.

फोन - **+91 91676 00365, 022-2614 6641**

**नमस्कार**

सर्व प्रथम सगळ्यांना हिंदु नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...

सध्या कोरोना व्हायरसने जगभरात धुमाकूळ घातला आहे. आपल्या मुंबईतही काही रुग्ण सापडले आहेत.

सुरवातीचा काही काळ हा सर्वांसाठी संभ्रमाचा होता तो तसा आमच्यासाठीही होता. म्हणून त्या काळात सर्वांच्या काळजी पोटी आम्ही **विजय स्टोअर** बंद ठेवलं होतं. पण आता....

मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्र्यांनी या प्रसंगी ह्या काळात कोणत्या जीवनावश्यक गोष्टी चालू रहातील ह्याची स्वच्छता दिली आहे...

म्हणून आम्ही **विजय स्टोअर दिनांक २६/०३/२०२० पासून रोज सकाळी ९ ते ११** चालू करत आहोत.

मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्र्यांनी आपल्याला या कठीण प्रसंगी **सोशल डिस्टनसिंग** द्वारे कशी काळजी घ्यावी हे सांगितले आहे..... ती सर्व काळजी आम्ही आपल्या काळजीपोटी घेणार आहोत..... याला आपण सहकार्य कराल याची खात्री आहे.

**१) गर्दी करू नका**

**२) सामानाची यादी तयार करूनच घेऊन या.... म्हणजे वेळ जाणार नाही**

**३) कृपया सुट्टे पैसे घेऊन या**

**४) नियमांचे काटेकोर पालन करा सोशल डिस्टनसिंग ठेवा**

**स्वतः ची काळजी घ्या आणि इतरांनाही सहकार्य करा.**

आमची शाखा कुठेही नाही



**जोगळेकर्स - डायरेक्ट टू होम**



७ जानेवारी २०१३ रोजी आम्ही सर्व प्रथम पपई विकावयास सुरुवात केली .त्यानंतर किरकोळ भाजी विकून नंतर त्यात नविन वस्तू add करूंन घरपोच भाजी देऊ लागलो.आपण वेळोवेळी दिलेल्या सुचनांमुळे व सहकार्यामुळे आम्ही आता घरपोच सेवा व किरकोळ विक्री चालू केली.

येत्या **शनिवारी दि १९ डिसेंम्बर २०२०** पासुन विले पार्ल्यात प्रथमच आपल्यासाठी नविन उपक्रम घेऊन येत आहोत नाविन्यपूर्ण **आठवडी बाजार रास्त दरात**

आपल्या पार्ल्यातील दुकानात **शनिवारी सकाळी ८ ते ११** या वेळेत भेट देऊन दुकानात उपलब्ध असणारे १५० च्या वर प्रॉडक्ट्स एकाच छताखाली खरेदी करू शकता.

: प्रॉडक्ट्स ची यादी खालीलप्रमाणे :

**◆ ताज्या भाज्या, पालेभाज्या, कांदा बटाटा, नारळ ◆ कडधान्ये**

**◆ सर्व प्रकारची पिठं ◆ चटण्या, लोणची**

**◆ ऑरगॅनिक गुळ आणि गुळाची पावडर**

**◆ हातसडीचा तांदूळ, अनपॉलिशड डाळी ◆ लाकडी घाण्यावरचे तेल**

**◆ घरगुती मसाले ◆ बदाम पिस्ता बिस्किटे, नानकटाई, चिक्की**

**◆ सुप्रसिद्ध देसाई बंधू पावस यांचा कोकणचा मेवा**

**◆ परांजपे रत्नगिरी यांचे फ्लेवर्ड काजू**

**◆ श्रीखंडाचे आणि खरवसाचे वैविध्यपूर्ण प्रकार**

**◆ हॅपी टंग फूड्स ची फ्रोझन प्रॉडक्ट्स ◆ मोड आलेले मटकी आणि मूग**

दुकानाचा पत्ता :

**जोगळेकर्स**

**सीमा बिल्डिंग, कुंकुवाडी हनुमान मंदिराच्या जवळ, पी. एम, रोड, विलेपार्ले पूर्व.**

आपले विनम्र : मृदुला जोगळेकर - ९७६९४७५५८५

## संपादकीय

एवादी मोठी घटना घडली की तिचे पडसाद पुढील काही काळ जाणवत राहतात. कोरोनाची जागतिक महामारी ही एवढी भयानक आणि विलक्षण घटना होती की त्याने अख्खे जगच बदलून गेले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर ह्या घटनेचा परिणाम झाला. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिक, कुठलेच क्षेत्र ह्यातून सुटले नाही. आपल्या खाण्या पिण्याच्या सवयी, आपले राहणीमान आणि अग्रक्रम, विचार करण्याची आणि जगण्याची पद्धत, सारे सारे बदलून गेले. लाखो लोक मृत्युमुखी तर पडलेच पण अनेक व्यवसायांवर कुलूप लावण्याची वेळ आली, असंख्य लोकांच्या नोकऱ्यांवर गदा आली, हजारो संसार उध्वस्त झाले. खरंच, कधी कल्पनासुद्धा केली नव्हती अशा भीषण परिस्थितीतुन जग गेल्या वर्षभरात गेले आहे.

हे जरी खरे असले तरी गेल्या काही महिन्यांपासून परिस्थिती हळूहळू बदलते आहे. एका बाजूने कोरोनाचा संसर्ग कमी होत आहे आणि काही प्रमाणात लोकं सुद्धा ह्या नवीन जीवन पद्धतीला सरावले आहेत. देशभरात पहिल्या टप्प्याचे लसीकरण सुरु झाले आहे त्यामुळे सुद्धा काळजीचे वातावरण निवळण्यास मदत झाली आहे. मुंबईकरांचे जीवन बहुतांशी सुरळीत झाले असून एकदा का लोकल गाड्या सर्वांसाठी खुल्या झाल्या व शाळा कॉलेज सुरु झाली की सर्व काही पूर्ववत झाले असे म्हणायला हरकत नाही.

ह्या काळात आपण सर्वांनी खूप काही गमावले, काही प्रियजन आपल्याला सोडून गेले, अनेक व्यावसायिक संधी हातातून निसटल्या, आर्थिक नुकसान झाले, पण मित्रांनो, ह्याच काळात आपण अनेक नवीन गोष्टी शिकलो सुद्धा. आपले छंद जोपासायला थोडी उसंत मिळाली, (माझ्यासारख्या) अनेकांना घरातल्या कामांची थोडीफार ओळख झाली, शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्व आपल्याला समजले, व्हर्चुअल व डिजिटल जगाशी मैत्री झाली, कोरोनच्या निमित्ताने अनेकांना आपल्या व्यवसायाची पुनर्बांधणी करण्याची संधी मिळाली, एका अर्थाने कोरोनाने आपल्याला जगाकडे बघण्याचा नवीन, सकारात्मक दृष्टिकोन दिला, कठिण परिस्थितीतही तग धरुन रहाण्याची जिद्द शिकविली. मोठाच फायदा आहे हा.

भूतकाळातील वाईट दिवसांच्या, संकटांच्या आठवणी काही काळानंतर ह्य होतात. काही वर्षांनी कोरोनाच्या जखमाही भरून निघतील पण ह्या काळात आलेले शहाणपण मात्र आपल्याला सतत उपयोगी पडत राहील. कालाय तस्मै नम: !


आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मालवणकर
पूर्वा कळंत्रे
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
रोहित जाधव
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


## खाऊगल्ली

२०२० हे वर्ष आपल्या सगळ्यांसाठीच आठवणीत राहील असं वर्ष होतं. लॉकडाऊनमुळे आपल्या दैनंदिन जीवनात पण खूप फेरफार करायला लागले. रोजच्यासारखे घराबाहेर न जाणं,



मास्क लाऊनच घराबाहेर पडणं,हात वेळोवेळी धुणे , भाज्या फळे नीट स्वच्छ धुणे इत्यादी. या काळात आपण खूप काही गोष्टी शिकलो, काही मिळवलं आणि काही गमावलं सुद्धा. याच काळात काहींनी संधीचं सोनं केलं तर काहींना काही गोष्टी नाईलाजाने कराव्या लागल्या.

या काळात सगळ्यात जास्ती फूड इंडस्ट्रीशी निगडित व्यवसायाला मागणी होती . व्यवसाय म्हणून पण आणि हौस म्हणून बरेच जणं इंटरनेटवर बघून नवीन नवीन पदार्थ करायला शिकले .या मागे दोन कारणं होती एक तर हॉटेल्स ,कॅफे हे बंद होते आणि दुसरं कारण म्हणजे चमचमीत खाण्याची इच्छा कमी



झाली नव्हती आणि घरून काम असल्याने किंवा काहींना काही काळ ऑफिस बंद असल्याने पदार्थ करून बघायला वेळ मिळत होता.

घरी बनवून खाणं आपण प्रत्येकाने काही काळ एन्जॉय केलं . घरातल्या पुरुष मंडळींनी सुद्धा यात सहभाग घेतला. सोशल मीडियावर या काळात खाण्या-पिण्याविषयीच्या पोस्ट किंवा चर्चा रंगल्या. एकमेकांना फोनवर सुद्धा

'' इतक्यात नवीन कुठली डिश करून पाहिली '' असा प्रश्न हमखास विचारला जायचा . आधी ज्या गोष्टींचा आपण विचारही केला नव्हता त्या गोष्टी या काळात करून बघितल्या.

सगळ्या पदार्थांमध्ये अग्रेसर होता तो केक. बऱ्याच लोकांनी केक घरी करून पहिला. त्यात व्हेरिएशन सुद्धा करून बघितलं. ऑनलाईन केकचे वर्कशॉप्स पण घेता येतात हे आपल्याला या काळात नव्याने कळलं आणि अर्थातच हे खूप डिमांड मध्ये होतं. हल्लीच्या ट्रेंड प्रमाणे कुठल्याही शुभ कार्याला आपण केक ऑर्डर करतो. पण लॉकडाऊनमुळे सगळी केक शॉप्स बंद असल्याने होम बेकर्सचा भाव वधारला. लॉकडाऊन शिथील झाल्यावर देखील केक शॉप्स मधून केक घेण्यापेक्षा होम बेकर्स कडून केक घेण्याकडे लोकांचा कल दिसू लागलाय.याच महत्वाचं कारण म्हणजे हायजिन आणि विश्वास.

सगळं आता हळू हळू पूर्ववत होतंय त्यामुळे होम बेकर्स बरोबरच हॉटेल्स,कॅफे पण सुरु झाले आहेत. त्यामुळे थोडी कॉम्पिटिशन वाढली आहे असं म्हणायला हरकत नाही. अर्थात व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणून दोन्ही कडचं खायला आपल्याला नक्की आवडेल.

या सदरात आपण लॉकडाउन मध्ये तयार झालेले काही होम बेकर्स आणि कॅफे,इटिंग जॉइंट्स या विषयी वाचणार आहोत. सो बी रेडी फॉर टेस्टी फूड .

- ग्रीष्मा बेहेरे
९९६९३९२५८८





# गुलमोहोर ट्रॅव्हल्स
## आयोजित सहली

| | |
|---|---|
| २३ ते २४ जाने. | - हुरडा पार्टी - संकल्प गार्डन, तुळापूर, देहू, त्रिवेणी संगम, प्रति शिर्डी |
| २४ जाने. | - हुरडा पार्टी - संकल्प गार्डन, प्रति शिर्डी |
| २६ जाने. | - ट्रेक - मानगड, देवकुंड बेस. |
| ३०-३१ जाने. | - ईको - ॲग्रो टुरीझम - भिगवण, उजनी डॅम, बारामती |
| १२ ते १४ फेब्रु. | - स्ट्रॉबेरी महोत्सव - महाबळेश्वर, प्रतापगड, भिलार,मॅप्रो |
| १६ ते २१ फेब्रु. | - हेरीटेज - हंपी, बदामी, विजापूर, पट्टडकल, ऐहोळे, शाकंबरी मंदीर |
| २७ ते २८ फेब्रु. | - हेरीटेज- नाशिक, स्वा.सावरकर जन्मस्थान, मिनरल, आर्टिलरी म्युझियम |

अधिक माहिती व बुकींगसाठी संपर्क
सुबोध जोशी - 9769008775 सचिन जोशी - 9869376515
www.gulmohortravels.com

## GOLDEN GATE PROGRAMME
107 B, 1st Floor, Hemu Arcade, Vile Parle (W), Mumbai 400056
www.goldengatetoiit.co.in

**ATTENTION**

STD-X STUCENTS (ICSE, CBSE, IGCSE, SSC) 2 YEAR GROUP TUITION PROGRAMME FOR

**JEE MAIN AND JEE ADVANCED**
Covering
JEE Main, JEE Advanced, BITSAT, MHT CET
Chemistry : Dr. U.R. Kapadi, Ph.D., IIT (Bombay)
Prof. Tarun Ahirwar, B.Tech. (IIT ISM Dhanbad)
Physics : Prof. Manoj Karmarkar, M.Tech., IIT (Bombay)
Prof. Indraneel Naik, M.Tech. (NIT)
Mathematics : Prof. Vinayak Antarkar, B.Tech., IIT (Bombay)

**JEE MAIN AND MHT CET**
Covering
XI, XII (HSC), MHT CET, JEE MAIN
Chemistry : Dr. U.R. Kapadi, Ph.D., IIT (Bombay)
Prof. Pritam Panchal, M.Sc., IIT (Bombay)
Physics : Prof. Devendra Verma, M.Sc. Physics
Prof. Saurabh Phansalkar, M.Sc. Physics
Mathematics : Prof. Vinayak Antarkar, B.Tech., IIT (Bombay)
Prof. C.C. Thite, B.Tech., IIT (Delhi)

Seminars / Entrance Tests / Counselling Sessions. CONTACT US : Prashant Sir : 7039679129 / 9004607404

# आसपास

पुणे बायपास मागे टाकून आमची गाडी सोलापूरच्या दिशेने पळत होती. मुंबईवरून पहाटे ५. ३० वाजता प्रयाण केले होते. काही वेळापूर्वी नाश्ता झाल्याने ग्रुप मधील बरीचशी मंडळी डुलक्या घेत होती. बारामती जवळील भिगवण पक्षी अभयारण्यात मी आजवर अनेक नसर्गप्रेमींना घेऊन गेलो असलो तरीही प्रेत्येक वेळी तीच उत्सुकता मनात असते.



पुण्यापासून १०५ कि.मी.च्या आसपास असलेल्या भिगवणला महाराष्ट्राचे भरतपूर म्हणायला काहीच हरकत नाही. भिरा नदीवरील उजनी धरणाच्या बांधामुळे अडलेल्या पाण्याचा जलाशय हा केवळ स्थानिक आणि स्थलांतरित पक्ष्यांच्याच नाही तर निसर्ग प्रेमी आणि छायाचित्रकारांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदु ठरला आहे. सामान्यत: भिगवण आणि फ्लेमिंगो पक्षी यांचे ठाम समीकरण लोकांच्या मनात बसले असेल तरीही माझ्यामते येथे बघण्यासारखे बरेच काही आहे. अनेक प्रकारचे पाणथळीतील पक्षी, चिखल तुडवणारे पक्षी तर येथे आहेतच पण जवळील जंगलात फेरफटका मारल्यास जंगलातील पक्षी तसेच शिकारी पक्षी सहज दृष्टीस पडतात. नशिबाने साथ दिली तर जंगलात सरपटणारे प्राणी, मुंगूस, लांडगेसुद्धा पाहायला मिळतात. पक्ष्यांची संख्या तर इतकी आहे की छायाचित्रकारांना कुठले फोटो काढू आणि कुठले नको असा प्रश्न पडावा!





दुपारी साधारणपणे १-१.३० च्या आसपास भिगवणला पोहोचलो. फेब्रुवारीचे दिवस त्यातच जलाशय आणि जंगलाचे सानिध्य असल्याने भर दुपारी पण चांगलीच थंडी होती. येथील स्थानिक लोकांच्या घरात आम्ही राहण्याची आणि जेवणाची सोय केली होती. खोल्या अगदी साध्या असल्या तरी स्वच्छ आणि नीटनेटक्या होत्या. मावशींनी चुलीवर बनवलेल्या साध्या पण अतिशय चविष्ट जेवणाला तर सर्वांची भरभरून दाद मिळाली,

सायंकाळी आम्ही आमची पहिली सफारी केली. त्याकरता क्रांती फ्लेमिंगो पॉईंट वर जाताना वाटेतच अनेक पक्षी दिसत होते. चित्रबलाक, साधे करकोचे, काळे आणि मोर शराटी (इबिस), चमच्या, उघड्या चोचीचे करकोचे चिखलातून खेकडे, मासे, कीटक वेचून फस्त करत होते. या भाऊगर्दीत गायबगळेही होते. पुढे जसजसे पाणी वाढू लागले तसे छोटे आणि मोठे बगळे, राखी बगळे पाण्यातून चालताना किंवा आमिषावर एकटक नजर ठेऊन साधना करताना दिसत होते. चक्रवाक, बदके मजेत पोहत होती. सुरय पक्षी घिरट्या घालताना मध्येच सूर मारून मासेमारी करत होते. विविध प्रकारचे धीवर भक्षावर टपून बसले होते. नांगरलेल्या बोटीचा उपयोग भुरे बगळे, खंड्या, कवड्या हे पक्षी टेहेळणी बुरुजासारखा करत होते.

हाताने वल्हवायच्या बोटीत बसायचा योग् फारा वर्षाने आला असल्याने धाकधूक होती. परंतु एकदा होडी सुरु झाली आणि पाण्यातून आम्ही पक्ष्यांच्या जवळ जाऊ लागलो तोपर्यंत या सर्व गोष्टीचा विसर पडला. संथ गतीने चालणारी नाव आता पक्ष्यांच्या जवळ गेली तरी ते घाबरून उडत नव्हते. काय गम्मत आहे पहा! किनाऱ्यावरून येणाऱ्या माणसाला घाबरून उडणाऱ्या पक्ष्यांच्या जवळ पाण्यातून गेले तर ते घाबरत नाहीत. अगदी जवळून आम्ही अनेक फोटो



घेतले. वाटेत एका टापूवर पन्नास-साठ पाणकावळे एका दिशेकडे तोंड करून उभे होते. जणू काही चंद्रभागेच्या वाळवंटात विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी वारकरीच रांगेत उभे आहेत! त्यातच एक राखी बगळा त्या काळ्या पार्श्वभूमीवर उलट दिशेने तोंड करून विरोधाभास निर्माण करत होता. येथे उजनी धरणाच्या पाण्यात मासेमारीचा धंदा खूप प्रमाणात चालतो. मासेमारी बोटींच्यावर मासे खाण्यासाठी टपलेले पक्षी घिरट्या घालत होते. आता नावाडी दूरवरील किनाऱ्याच्या उथळ भागात होडी घेऊन चालला होता. वाटेत टेकडी वजा डोंगर असल्याने पलीकडचे काही दिसत नव्हते. वळसा घालून पुढे गेल्यावर दिसलेल्या दृश्याने डोळ्याचे पारणे फिटले. दीड-दोन हजार फ्लॅमिंगोजच्या थव्याने सर्वत्र पांढऱ्या- गुलाबी रंगाची उधळण केली होती. इतक्यात का कोण जाणे पंखांची फडफड करत थव्याने एकदम उड्डाण केलेआणि आमच्या डोक्यावरून चार-पाच चकरा मारून हा पक्षीगण दूर दिसेनासा झाला. अशा वेळी अद्भूत हा शब्दही हे वर्णन सार्थ करायला अपुरा पडतो. आता पाण्यावर मावळतीच्या सूर्याचा पसरलेला केशरी तांबडा रंग पाहून मन आणखीनच प्रफुल्लित झाले. 'ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर' – मला उगीचच बालकवींची आठवण झाली




गाईड बरोबर रात्री जंगलातून फिरताना अनेक निशाचर पक्ष्यांचे आवाज कानी पडत होते. खऱ्या निसर्ग प्रेमींसाठी ते संगीतच . आमच्या नशिबाने आम्हाला हिरव्या रंगाचा शॅमेलियन आणि ओझरता का होईना कोल्हा दिसला. जंगलात पायी फिरताना दोन तास कसे गेले कळलंच नाही

सकाळचा जंगल आणि जलाशयाचा सानिध्यातील सूर्योदय तर मी पुस्तकात ठेवलेल्या मोरपिसासारखा मनाच्या आठवणीत जपून ठेवला आहे. कोतवाल, होला , परीट, सातभाई, सर्पगरुड असे अनेक पक्षी दिसले तरीसुद्धा भूक भागली नव्हती. पण आता माघारी परतायची वेळ झाली होती. जड अंत:करणाने भिगवणचा निरोप घेतला तो येथे लवकरात परत येण्याचा निश्चय करूनच.

आमिर खुसरौ ने काश्मीरच वर्णन 'पृथ्वीवर स्वर्ग असेलच तर तो हाच'आहेअसं केलं आहे. ज्याला अनेकविध पक्षी पाहायचे आहेत, रात्री आणि दिवसा जंगलातून पायी फिरायचं आहे, प्रदूषण विरहित आकाशात आकाशगंगा पाहायची आहे अशा निसर्गवेड्यांसाठी भिगवण हा स्वर्गच आहे. चलाता का मग आमच्याबरोबर भिगवणला ?

**संजय देवस्थळी**

९८३३८६६४६२

साजिरी

प्रस्तूत करीत आहे

**सारी की सारी बाते!**

साड्या डिझाईन करण्यापासून
जुन्या साड्यांवर नवीन कल्पक ब्लाउज
शिवण्यापर्यंत सर्वकाही.

- साड्यांसाठी ब्लाऊज पीस,
- परकर आणणे
- फॉल बिडींग करणे
- रोल प्रेस करणे
- गोंडे लावणे
- नेट लावणे
- साडी ड्रेपिंग

अधिक माहितीसाठी संपर्क साधा

**दीपा लेले चेऊलकर - 91364 05267**

## Young Turks of Parle उमेश जोशी.... शेफ, गायक, प्रकाशक, यु-ट्युबर



अष्टपैलू व्यक्तिमत्व ह्या शब्दाला जागणारे फार थोडे जण असतात पण ह्या शब्दाला चपखल असे उदाहरण द्यायचे तर आपल्या पार्ल्यातील उमेश जोशी ह्याचे देऊ शकतो. पार्ले टिळक विद्याघरातील मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेला उमेश, ज्युनिअर कॉलेजच्या दोन वर्षात डहाणूकर कॉलेजच्या अनेक म्युझिकल इव्हीनिंग गाजवणारा उमेश, आजही त्याच्या बॅचच्या मित्रांच्या लक्षात आहे तो त्याच्या 'पल पल दिल के पास' ह्या गाण्यासाठी. डहाणूकरच्या त्या दोन वर्षांनंतर त्याने आपली वाट बदलली आणि रिझवी कॉलेजमधून त्याने हॉटेल मॅनेजमेन्टचे शिक्षण घेतले. उमेश किती उत्तम शेफ आहे हे जाणण्यासाठी एकदा त्याच्या हातची बिर्याणी तुम्ही खाल्लीच पाहिजे. अर्थात करिअरच्या सुरवातीच्या दिवसात त्याने अनेक पंचतारांकित हॉटेल्स मध्ये त्याने शेफ म्हणून काम केलेले आहे. आजही तो त्याच्या अनेक नवीन रेसिपीझ आपल्या ओळखीच्या लोकांना 'दावत-ए-ळ०' ह्या नावाने पाठवत असतो. पण आता तो हौशी शेफ म्हणूनच काम करतो. नुसतंच शेफ म्हणून नाही तर स्वत: उमेश वसईला काही काळ एज्म्'हि् घ्म नावाचे स्वत:चे हॉटेल चालवत होता. पण आज उमेश ओळखला जातो तो एक गायक, प्रकाशक आणि यु-ट्युबर म्हणून.

व्यावसायिक गायक म्हणून उमेशने कोरस गायक म्हणून त्याचा प्रवास सुरु केला आणि बघता बघता ए. आर. रेहमान ते आपले मराठीतील आघाडीचे संगीत दिग्दर्शक अजय-अतुल ह्या सर्वांबरोबर त्याने कोरस मध्ये काम केले आहे आणि आजही करतो आहे. ह्यात त्याला त्याच्या पत्नीची प्रगतीही तेवढीच भक्कम साथ आहे कारण स्वत: प्रगती हि सुद्धा उत्तम गायिका आहे. लई भारी चित्रपटातील 'माउली माउली', पानिपत चित्रपटातील 'मर्द मराठा', जोधा-अकबर चित्रपटातील 'अझीम-ओ-शान शेहेनशाह' या हिंदी तर बालगंधर्व, कट्यार काळजात घुसली, ठाकरे या आणि अशा अनेक हिंदी मराठी तसेच प्रादेशिक भाषांतील चित्रपटातील प्रसिद्ध गाण्यांमध्ये तो कोरस मध्ये होता.

पण हाच उमेश, आपल्याला अजून एका रूपाने भेटतो तो म्हणजे इतिहास तज्ञ् म्हणून. सध्या सगळीकडेच सोशल मिडियावर खोटा इतिहास, खोट्या बातम्या पसरवल्या जातात. तेव्हा मराठ्यांचा स-संदर्भ इतिहास आपल्या लोकांपर्यंत पोहोचावा म्हणून त्याची प्रकाशन संस्था 'राफ्टर पब्लिकेशन्स' अहोरात्र झटत असते. जरी ह्या प्रकाशनाचे पहिले पुस्तक हे 'काहीतरी नवीन' हे इतिहासाशी संबंध नसलेलं पुस्तक होतं. तरी सुद्धा त्यानंतरचे प्रत्येक पुस्तक मराठ्यांच्या इतिहासाची गौरवगाथा सांगणारीच असतात ह्यात महत्वाची पुस्तके म्हणजे 'इतिहासाच्या पाऊलखुणा मालिका', 'पेशवाई' आणि 'शहामतपन्हा बाजीराव'. एकूण २० पुस्तके ह्या प्रकाशन संस्थेची आहे आणि ती अमेझॉनवर उपलब्ध आहेत. पण जास्तीतजास्त लोकांपर्यंत मराठी राज्याचा इतिहास पोहोचावा म्हणून नव्या तंत्राची कास धरून उमेश आणि त्याचा मित्र प्रणव महाजन ह्यांनी 'मराठा हिस्ट्री' हे भ्दल् ऊलं चॅनल सुरु केले आणि प्रकाशन संस्थे प्रमाणेच त्याला इतिहासप्रेमींचा भरघोस प्रतिसाद मिळाला. आज ह्या चॅनेलचे २ लाख ४० हजार सबस्क्रायबर्स आहेत. ह्या चॅनलवरच्या प्रसिद्ध मालिका म्हणजे 'मंथन', 'पानिपत' आणि असे अनेक व्हिडिओ. मराठी राज्याचा इतिहास इतर भाषिकांपर्यंत पोहोचावा म्हणून त्यांनी 'विरासत' हे हिंदी आणि 'हिस्टीरिओग्राफी' हे इंग्रजी चॅनेलसुद्धा चालू केलं आहे. उमेश नेहमी गमतीत म्हणतो कि आपला इतिहास सगळ्या जगापर्यंत पोहोचावा म्हणून आम्ही अगदी तामिळ-तेलगू चॅनल पण सुरु करू. असा हा आपला उमेश ऐतिहासिक दस्तावेज वाचावेत म्हणून मोडी शिकला आणि आज तो महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त मोडी लिप्यांकार आहे. जसं सुरुवातीला लिहिलं तसं खऱ्या अर्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्व.

इतिहास प्रेमींसाठी उमेशच्या You Tube चॅनेलच्या लिंक्स इथे मी देत आहे.

मराठी - http://www.youtube.com/MarathaHistory

हिंदी - http://www.youtube.com/Virasat

इंग्रजी - http://www.youtube.com/Historiography

**डॉ अमेय तानवडे**

**९८२०४३२७२०**

## आमचा 'प्रकाश' हरपला



प्रकाशगेलाही भयंकर बातमी VPRC क्रिकेट क्लबच्या व्हाट्सअप ग्रुपवर वाचली आणि पहिली प्रतिक्रिया मनात उमटली ' नाही नाही शक्य नाही. हे खोटे आहे. काहीतरी चूक होतेय. आपल्या कारकिर्दीतील शेवटच्या खेळीत Don Bradman शून्यावर बाद झाला तेव्हा ही उपस्थित प्रेक्षक असेच काहीसे गोंधळले असावेत. कारण प्रकाश इतका भरवशाचा खेळाडू व जन्मजात लढाऊ बाणा असलेला माणूस इतक्या सहजी हार मानेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. काहीच दिवसांपूर्वी माझा परममित्र व प्रकाशचा मोठा भाऊ बाबा सुर्वे याने मला प्रकाश covid १९ मुळे हॉस्पिटलमधे आहे हे सांगितलं तेव्हाही मला काडीचीही काळजी वाटली नव्हती. प्रकाशना ! त्याला काय होतंय !!दोन दिवसात येईल तो घरी असच मनात आलं. ते बोलूनही दाखवायची गरज वाटली नाही. हो काय? असं म्हणून त्याच्या घरच्या इतर आजारी माणसांची काळजी करण्यात आम्ही गुंग झालो. आणि आता ही बातमी. काहीही व कोणालाही गृहीत धरू नये हा धडा वारंवार फक्त वाचला होता आज तो प्रॅक्टिकलला आला व आम्ही सर्व त्यात सपशेल नापास.

प्रकाश माझ्याहून जवळजवळ 10 वर्षांनी मोठा. त्यामुळे भेट त्याच्या घरी किंवा मैदानावरच होई. तो खूप स्कॉलर आहे असं ऐकून होतो. त्याची ती हुशारी क्रिकेटच्या मैदानावरही दिसून यायची. त्याचा batting stance विचित्र होता. क्रिकेट टॅलेंटही तस मर्यादित पण या सगळ्यांची कसर तो त्याच्या एकाग्रतेने, निरीक्षण शक्तीने व प्रचंड इच्छाशक्तीने सहज भरून काढायचा. मिशीला पीळ देऊन डोळे बारीक करून गोलंदाजी करणाऱ्याकडे 'तू मला कसा बाद करतोस ते बघतोच मी ' अश्या प्रकारे फलंदाजी करणारा प्रकाश अजून माझ्या डोळ्यासमोर आहे. त्यातून तो खूपच सुरक्षित विकेटकिपर. पार्टी पडून खेळायच्या दिवशी सगळे कॅप्टन आधी त्याला मागून घ्यायचे म्हणजे०कीपिंगचा व एका बाजूच्या battingचा प्रश्नच मिटला. फक्त धावा धावणे या गोष्टीचा प्रश्न होता. कारण गंमत म्हणजे प्रकाश खूप चळवळ्या. जलद बोलायची सवय त्यातूनच आली असावी. तो काय कॉल देतोय ते समोरच्याला बऱ्याचदा त्यामुळं समजतनसे. बरं yes, no, wait असा एक शब्दी call तो कधी देत नसे. बॉल कस righthand फिल्डरच्या left ला आहे, तो फिल्डर कसा स्लो आहे, त्याला त्याच्या stiff कमरे मुळे कसे वाकताच येतं नाही किंवा त्याचा थ्रो कसा accurate नसतो इ. इ. सांगून तो रन काढण्याचा आग्रह करायचा. पण त्याचे भरभर बोलणेन समजल्या मुळे समोरचा गोंधळून रन आऊट होई. पण कोणतीही प्रॅक्टिस नकरता नेहमीच सहज रन्स करणारा व प्रसंगी Times Shield सारख्या महत्वाच्या टूर्नामेंटमधे century ठोकणारा प्रकाश सारखा खेळाडू विरळाच.

प्रकाशचा अजून एक गुण म्हणजे त्याचा सतत हसतमुख चेहरा.'बस काय, बस काय' हे खास त्याच असं पालूपद लावून गोड बोलणं. मी कधीही त्याला त्रासलेला, चिडलेला बघितल्याचे आठवत नाही. कोणत्याही वेळी कोणत्याही ग्रुपमधे त्याची आठवण निघाली की कोणत्याही स्वभावाच्या माणसाच्या चेहऱ्यावर छानसं हसू आल्या शिवाय राहायचं नाही.

प्रकाश गेल्यावर त्याच्या 1968 च्या S.S.C. बॅच मधील असंख्य मित्रमैत्रिणींच्या पोस्ट्स माझ्या वाचण्यात आल्या. त्याचा परम मित्र रवी अथनीकर याच्या निधनानंतर त्याच्या स्मृतीला वंदन करणारा प्रकाशचा त्यातील लेख इतका हृद्य आहे की प्रकाश हा एक उत्तम लेखकहीहोता याचा मला साक्षात्कार झाला. भरभर बोलायची सवय नसतीतर तो एक उत्तम वक्ताही नक्की झाला असता याची मला खात्री आहे. एक उत्तम विद्यार्थी, इंजिनिअर, कॉर्पोरेट मॅनेजर, मुलगा, भाऊ, मित्र, नवरा,बाप, क्रिकेटर, लेखक व सर्वात महत्वाचं म्हणजे एक उत्तम माणूस असं एक खूप अनोखं रसायन होता प्रकाश म्हणजे. त्याच्या स्मृतीसवंदन करणाऱ्या त्याच्या असंख्य मित्रांच्या पोस्ट्सवरून याची खात्री पटते. यातीलच एककविता येथे देऊन थांबतो. प्रकाशच्या आठवणी आमच्या मनात कायम सूर्यप्रकाशा इतक्या स्वच्छ राहतील.

**प्रसाद आठल्ये**

**९८२०६१३४४५**



# घरातील ॲप्लिकेशन्सचे सुसूत्रीकरण ही काळाची गरज

कुठचेही तंत्रज्ञान हे कुठच्या उद्योगाला सुचवण्यामागे मुख्य उद्देश असतो तो म्हणजे त्या तंत्रज्ञानाने होणारे फायदे. हे फायदे आर्थिक असतात, व्यवहारसुलभतेचे असतात, ग्राहकोपयोगी असतात तर कधी उद्योगात सुटसुटीतपणा आणणारे असतात. या तंत्रज्ञानामागचे जे सूत्र असते तो जसा उद्योगधंद्याला लागू असते तसेच आपल्या घरगुती आयुष्यातही लागू असते फक्त ते तंत्र अमलात आणायच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. अशाच काही कल्पनांचा आढावा आपण या वर्षी घेणार आहेत.



कुठच्याही माहिती तंत्रज्ञान उद्योगात वर्षानुवर्षांपासून वापरात असलेली अनेक ॲप्लिकेशन्स असतात. काळाप्रमाणे त्यात वाढ होत जाते आणि अशी परिस्थिती येते कि वेगवगळ्या कालखंडात वेगवेगळ्या कारणासाठी वापरात असेलेली ही ॲप्लिकेशन्स सांभाळणे खर्चिक होतेच पण त्याचा फायदाही होत नाही. अशावेळी सुचवण्यात येतो पर्याय तो या सर्व ॲप्लिकेशन्सचा आढावा घेऊन त्यात अति महत्वाची, महत्वाची आणि गरजेची पण जीवनमरणाचा प्रश्न नसलेली कुठची याचे वर्गीकरण करणे आणि त्यांची वासलात लावणे. जी ॲप्लिकेशन्स घरात असणे फक्त हार्डवेअरची जागा अडवतात त्यांना जेव्हा लागेल तेव्हा वापरापुरते पैसे भरायच्या क्लाऊड सर्व्हिसेसमध्ये रूपांतरित केले जाते. यालाच ॲप्लिकेशन्स रॅशनलायझेशन किंवा सुसूत्रीकरण म्हणतात.

गेले वर्षभर घरून काम करताना दर शनिवार रविवारी मला एक छंद जडला तो म्हणजे घरात असलेल्या विविध गोष्टींची यादी करणे अथवा आढावा घेणे. आपल्या घरी वडिलोपार्जित गोष्टींपासून साठवलेल्या अनेक गोष्टी असतात. आपण त्या गोष्टी जपण्यात आपल्या पार्ल्यासारख्या जागेचे भाव गगनाला भिडलेल्या ठिकाणी घरातील बरीच अमूल्य जागा वापरत असतो. यापैकी खूप गोष्टींशी भावना, आठवणी जोडलेल्या असतात तेव्हा त्या व्यावहारिक दृष्ट्या निरुपयोगी गोष्टी असल्या तरी त्या टाकून देता येत नाहीत. पण त्या सोडूनही आपल्या घरी इतक्या गोष्टी असतात त्यांचे नक्कीच वर्गीकरण करता येते. गेल्या वर्षभरात मला लक्षात आले कि घरचे काही ड्रॉवर्स जमा केले तर हार्डवेअर, प्लंबिंग किंवा सुतारकामाचे दुकान मला चालू करता येईल. आपण घरातील स्विच बदलणे किंवा नळाचे काम करणे या गोष्टी स्वत:: करू शकतो हे बऱ्याच जणांना कौतुकास्पद वाटते पण ही कामे करण्यासाठी लागणारी साधनसामग्री साठवणे आणि वर्षातील कितीवेळा त्याचा उपयोग होतो याचा ताळमेळ घेतला तर या गोष्टी सर्व्हिसेस या सदरात मोडतात आणि बाहेरून माणूस आणून करून घेणे स्वस्त पडते. एखाद्या गोष्टीचे सांभाळण्याचे मूल्य म्हणजे त्यात ते ठेवायची जागा आली, त्याची देखभाल आली, सर्व आले याचा विचार त्याच्या वापराच्या उपयुक्ततेचे प्रमाण याची तुलना केली तर आपल्याला लक्षात येईल घरातील कित्येक अनावश्यक गोष्टी सर्व्हिसेस मध्ये आपण बदलू शकू.

आपल्या घरात कधी हौसेने घेतलेला पण फारसा न वापरलेला व्हॅक्युम क्लिनर, जुने शिवणाचे यंत्र, ज्यूस काढल्यावर साफ करायची कटकटच जास्त म्हणून ज्यातून कधीही ज्यूस न काढलेला ज्युसर अशी अनेक उपकरणे पडून असण्याची शक्यता आहे. मुंबईसारख्या ठिकाणी जिथे जादाची जागा स्वत:च तयार करावी लागते तिथे हे फार महत्वाचे ठरते. जसे उद्योगासाठी आर्थिक, व्यवहारसुलभतेची कारणे असतात तसेच आपल्या खाजगी आयुष्यातही हे सुसूत्रीकरण महत्वाचे ठरते. यातील सर्वात मोठे आणि खर्चिक उदाहरण म्हणजे सेकंड होम. जी लोकं नियमितपणे या सेकंड होमला जाऊन राहतात त्यांची गोष्ट वेगळी आहे पण अनेकांनी अशी सेकंड होम घेऊन तिथे वर्षावर्षात फिरकत नाहीत आणि गुंतवणूक म्हणावी तर फायदाही नाही.

नवीन वर्षात आपण आपल्या घरातील वस्तूंचे असेच सुसूत्रीकरण करायचा संकल्प केला तर आपलेच घर आपल्याला कितीतरी मोठे आणि सुटसुटीत वाटायला लागेल.

**-निमिष वा. पाटगांवकर**

**९८७०४६९९९३**

# देशोदेशी

मानवी इतिहासाची एकूण व्याप्ती पाहिली तर जेमतेम १५० वर्ष टिकलेलं इंका साम्राज्य क्षणभंगूरच म्हटलं पाहिजे. मात्र ह्या छोट्याशा कालखंडात उत्तरेला एक्वेडोर पासून दक्षिणेला बोलिव्हिया पर्यंतच्या प्रदेशात, हजारो फूट उंचीचे अतिशय दुर्गम डोंगरमाथे, त्यावरील पठारे आणि दऱ्याखोऱ्यात बांधले गेलेले रस्ते, पूल, गावं, किल्ले, बर्फाच्छादित पर्वतांचेसुद्धा उतार कापून काढून बनवलेली शेतीची खाचरं त्यांच्या तांत्रिक कौशल्याचे साक्षीदार आहेत. शिवाय संपूर्ण दक्षिण अमेरिकेत स्पॅनिश आक्रमण होईपर्यंत अवजड ओझी वाहून नेऊ शकतील अश्या ताकदीचे – घोडे, बैल, रेडे, उंट, हत्ती, गाढवे, खेचरे – असे कुठलेही प्राणी अस्तित्वात नव्हते. त्यामुळे सर्व प्रवास स्वत:च्या पायांनी आणि सर्व कष्टाची कामं स्वत:च्या हातानीच करावी लागत. ह्या पार्श्वभूमीवर तर इंका काळात झालेली प्रचंड बांधकामं अधिकच थक्क करणारी आहेत.

इंका साम्राज्य इतरही अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण होतं. राज्यातील सर्व संपत्तीवर फक्त राजाची मालकी असे. शेतातील प्रत्येक दाणा, झाडावरचे प्रत्येक फळ, अल्पाकाच्या लोकरीचा प्रत्येक धागा, सर्व उत्पादन राजाच्या कोठारात जात असे! त्याचबरोबर राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या अन्न, निवारा आणि कौटुंबिक स्वास्थ्याचीही जबाबदारी राजाच्या खांद्यावर होती. परंतु अत्यंत कार्यक्षम अशा उत्पादन, भरणा आणि वितरण व्यवस्थेशिवाय ५५०० किलोमीटर पेक्षाही जास्त पसरलेल्या साम्राज्यात हे सर्व साध्य होणं कठीण होतं. जेथे सर्व दळणवळण फक्त चालत (किंवा धावत) जाऊनच होत होतं, ज्यांनी कधीच लिखाणाचा शोध लावला नाही त्यांनी अशी व्यवस्था कशी काय निर्माण केली ही एक बुचकळ्यात टाकणारी गोष्ट आहे. अशी व्यवस्था होती मात्र नक्की, कारण त्याच्या खुणा आजही आपल्याला दिसतात – धान्याची कोठारं, रस्त्यांचं आणि टपाल व्यवस्थेचं जाळं, शेतकीसंशोधनाच्या प्रयोगशाळा आणि सर्वात वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे खिपू! खिपू हे एक हिशोब मांडून ठेवण्याचं साधन होतं. एका खिपू



मध्ये अनेक रंगाचे लोकरीचे धागे असत आणि प्रत्येक धाग्याला वेगवेगळ्या जागी गाठी मारल्या जात. ह्या धाग्यांचे रंग, लांबी आणि त्यावरील गाठी वापरून हिशोब (शेती मालाचं उत्पन्न, वितरण, पैशाची आवक जावक ई.) ठेवले जात. मात्र हे खिपू नक्की 'वाचायचे' कसे ह्याचं ज्ञान मात्र स्पॅनिश लोकांनी स्थानिक राज्यकर्त्यांचं जे शिरकाण केलं त्यात नाहीसं झालं.

संपूर्ण लोकसंख्येच्या पोटापाण्याची जबाबदारी डोक्यावर असल्यामुळे असेल कदाचित, पण शेतीसंवर्धनाला इंका राज्यव्यवस्थेमध्ये महत्वाचं स्थान होतं.

पेरूमधील उरुबाम्बा नदीच्या खोऱ्यात पिसाक पासून ओलीयान्तेताम्बो पर्यंत प्रवास करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला १६/१७ हजार फूट अशा उत्तुंग शिखरांच्या उतरणी कापून शेतीसाठी बनवलेली खाचरं डोक्यावरची टोपी पडेल इतक्या उंचीपर्यंत दिसतात. पण ह्या भागातली सर्वात थक्क करणारी जागा म्हणजे मोरे (११५०० फूट) येथील शेतीसंशोधन केंद्र. येथे वेगवेगळ्या पातळीवरील





वर्तुळाकार खाचरांमध्ये इंका साम्राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील शेतीची परिस्थिती तेथील माती, पाणी आणि (सूर्यप्रकाशाची आणि वाऱ्यांची दिशा चतुराईने वापरून) तापमानासकट तयार करण्यात येई.. येथे वेगवेगळ्या प्रकारची बियाणी



वापरून राज्याच्या कुठच्या भागात कुठलं पीक सर्वात उत्तम प्रकारे काढता येईल ह्यावर संशोधन चालत असे.

अशीच एक मारास नावाची आश्चर्यजनक जागा मोरे पासून जवळच आहे. सर्वसाधारणपणे मिठागरं (जिथे खाऱ्या पाण्याचं बाष्पीभवन करून मीठ बनवलं जातं) समुद्र किंवा खाडीच्या काठावर असतात. डोंगरामध्ये असतात त्या सैंधवच्या (हिमालय) खाणी. मारास मध्ये मात्र ११००० फूट उंचीवर




आहेत ती खाऱ्या पाण्यापासून मीठ काढायची मिठागरं. भूगर्भातून इतक्या उंचीवर बाहेर येणाऱ्या खाऱ्या पाण्याच्या दोन झऱ्यांचे पाणी वापरून गेली १४०० वर्ष इथे मीठ तयार केलं जातं. मात्र इंका काळात ह्यांचा मोठा विकास करण्यात आला आणि त्यांच्या योग्य नियोजनाची सहकारी तत्वावर व्यवस्था करण्यात आली – जी आजपर्यंत तशीच सुरु आहे. (पहा पाचवा फोटो).

ह्या पुढच्या भागात आपण पाहू तीन महत्वाची इंका स्थळे – राकी, ओलीयान्तेताम्बो आणि माचू पिच्चू.

**सतीश जोशी**

**९८२०२२८२७९**

# share बाजार आणि financial मार्केट




फायनान्शिअल मार्केटमधील एक महत्वाचा मार्केट आहे शेअर मार्केट . भारतात २ मोठे स्टॉक exchange आहेत, एक NSE & दुसरें BSE . NSE चा निर्देशांक १४४३३ तर BSE ४९०३४ ला शुक्रवारी १५ जानेवारीला बंद झाला. मार्च २०२० रोजी कोवीडमुळे स्टॉक मार्केटमध्ये प्रचंड प्रमाणात घसरण झाली. शेअर मार्केट आणि त्यातला उतार- चढाव हे एक समीकरणच आहे. स्टॉक मार्केटबद्दल बऱ्याच जणांच्या मनात प्रचंड कुतूहल आहे . एकीकडे इकॉनॉमीचे आणि धंद्याचे हाल covid-१९ मुळे झालेले दिसतात पण स्टॉक मार्केटमध्ये मात्र तेजी आहे... टेक्निकल आयर्नेलिस्ट म्हणून मी जवळ जवळ १८ वर्षे स्टॉक मार्केटचा अभ्यास करत आहे आणि काही गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात.

१. भारतात सर्वात जास्त तरुण वर्ग आहे.

२. स्टॉक मार्केट पडला कि ते साधारण एक वर्षात दुपटीने वाढते.

३. जागतिक कंपन्या भारतामध्यें बस्तान बसवत आहेत.

४. भारतात मध्यम वर्ग आणि त्याच्या जोडीने इंग्लिश बोलणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे.

५. आत्मनिर्भर भारताची वाटचाल सुरु जाहली आहे.

असा एक कव्हास आहे कि स्टॉक मार्केटची घोडदौड चढावाकडेच चालू राहणार आहे. भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि त्यांचा पक्ष त्या दिशेने वाटचाल करताना दिसतोय. GST आणि इंडिरेक्ट टॅक्सेसमध्ये उत्तरोत्तर वाढ होताना दिसते. म्युच्युअल फंड, ETF फंड, कमोडिटी मार्केट आणि त्याच्या जोडीला नवे शेतकरी कायदे (FARM LAWS) अनौपचारिकपणे स्टॉक मार्केट वर नेण्यास मदतच करताना दिसतील. भारतात डिजिटल टेक्नॉलॉजिचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून तरुण वर्ग सहजरित्या आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करत आहे. यामुळे स्टॉक मार्केटमध्ये काही प्रमाणात गुंतवणूक आकर्षक पर्याय ठरू शकतो.

पण एका सर्वसामान्य समाजातील वर्गाने स्टॉक मार्केटचा लाभ कसा करून घ्यावा ? गुंतवणुकीचे कुठले पर्याय उपलब्ध आहेत ?

१. नवशिके (BEGINNER) करता म्युच्युअल फंड हा एक चांगला पर्याय ठरू शकतो कारण एक जबाबदार फंड-मॅनेजर अनेक जणांची गुंतवणूक सांभाळत असतो ज्याला काही कायदेशीर बंधने आहेत. S.I.P. करणाऱ्यांनी large CAP, MID कॅप आणि स्मॉल कॅप मध्ये निदान ५ वर्षांकरता विचार करावा असे मला नमूद करावेसे वाटते. सेक्टर SIP, फार्मा बँक्स आणि infrastructure निदान ३ वर्ष. निर्देशांक खाली असताना गुंतवणूक केल्यास जास्त फायदा होऊ शकतो. ETF येत- EXCHANGE TRADED FUND तुम्हाला स्टॉक मार्केटप्रमाणे रिटर्न देऊ शकतो.

२. ज्यांनी ३ वर्ष किंवा अधिक वर्षे इन्व्हेस्टमेन्ट केली आहे त्यांनी काही प्रमाणात स्टॉकमध्ये डिरेक्टली गुंतवण्याचा विचार करण्यास हरकत नाही असे मला वाटते. स्टॉकमध्ये स्वत: गुंतवणूक केली असेल तर त्याची सांभाळायची जबाबदारी स्वत:ची असते जे काम म्युच्युअल फंडमध्ये फंड मॅनेजर करत असतो.

३. बरेच लोक IPO मधेही गुंतवतात, पण IPO मध्ये रिटेल इन्व्हेस्टरला फार जास्त स्टॉक मिळू शकत नाही असे दिसून आले आहे. तरीसुद्धा काही चांगले IPO विचार करण्याजोगे असतात.

४. आपल्या गुंतवणुकीच्या साधारण १०% गुंतवणूक गोल्ड & सिल्वर commodities मध्ये करावी असे मला वाटते. इमर्जन्सीच्या वेळेत ह्या उपयोगात येऊ शकतात.

५. हल्ली F&O (फ्युचर्स & ऑपशन्समध्ये) पण काही लोक गुंतवतात. पण त्याचा नीट अभ्यास केल्याशिवाय गुंतवू नये. F & O हा HEDGEING प्रॉडक्ट आहे.

या प्रमाणे शेअर मार्केट गुंतवणुकीकरता विविध पर्याय उपलब्ध आहेत. विचारपूर्वक योग्य ती काळजी घेऊन गुंतवणूक केल्यास त्याचा चांगल्याप्रकारे आर्थिक लाभ उठवता येऊ शकतो. सर्वात महत्वाचे म्हणजे, गुंतवणूक स्वत:चा आर्थिक तोल सांभाळून करावी.

**सुचित्रा आंबर्डेकर**
संस्थापक - टेकवेल्थ
९८२००५६९४३

# मनोरंजन विश्व

## सनम हॉटलाईन




सध्याच्या काळात वेबसिरीज हे माध्यम अधिक लोकप्रिय होऊ लागले आहे आणि आता हिंदी प्रमाणे मराठीत देखील अनेक उत्तम वेबसिरीज येत आहेत . 'सनम हॉटलाईन' ही एका वेगळ्या विषयावरची वेबसिरीज 'हंगामा डिजिटल मिडीयाच्या' हंगामा प्ले' या प्लॅटफॉर्मवर मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांत उपलब्ध आहे . 'कॅफे मराठी स्टुडिओ' यांनी या वेबसिरीजची निर्मिती केली आहे.

आता या मालिकेच्या कथानका विषयी जाणून घेऊया .

ईशान (पुष्करजोग) आणि अभिजित (उदय नेने ) हे दोन मित्र असतात . पण काही कारणा मुळे त्यांची कॉल सेंटरमधील नोकरी जाते .मग काहीतरी रोमांचक करायचे या हेतूने 'सनम हॉटलाईन' ही अडल्ट हॉटलाईन सुरु करतात. ग्राहकांच्या कल्पना आणि इच्छांचे समाधान तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करणारी ही सेवा असते. आपल्या मित्रांच्या या छोट्याशा स्टार्ट अप मध्ये त्यांची मैत्रीण शिवानी (सई लोकूर) सहभागी होते. ती ईशानची प्रेयसी असते .मात्र या हॉटलाईन व्यवसायाचा आनंद टिकत नाही असे काही घडते .

अचानक त्यांच्या ग्राहकांना खंडणीचे कॉल्स येऊ लागतात. सनम हॉटलाईनचे ग्राहक खंडणीच्या जाळ्यात अडकतात आणि मग पुढे काय होते, हे जाणून घेण्याकरिता तुम्हाला 'सनम हॉटलाईन' ही वेबसिरीज पाहावी लागेल .

या मालिकेत विनय येडेकर यांचीही भूमिका असून आकाश गुरसाळे यांनी या मालिकेचे दिग्दर्शन केले आहे. ही वेबसिरीज 'हंगामा' च्या 'हंगामा प्ले' या व्हिडीओ ऑन डिमांड प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे , तसेच एम एक्स प्लेअरवर सुद्धा तुम्ही ही पाहू शकता आणि कालांतराने 'सोनी लाईव्ह' वर देखील ही सिरीज उपलब्ध होईल .

## खिसा




जानेवारी महिन्यात १६ ते २४ जानेवारीला गोवा येथे ५१ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव साजरा होणार आहे . या महोत्सवात 'खिसा 'या मराठी शॉर्टफिल्मची अधिकृत निवड झाली आहे . पी. पी . सिने प्रॉडक्शन, मुंबई आणि लालटिप्पा निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन राज प्रीतम मोरे यांनी केले आहे तर या चित्रपटाचे लेखन कैलास वाघमारे यांनी केले आहे .

इस्तंबूल फिल्म अवॉर्ड्स २०२० मध्ये 'खिसा' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट पटकथा हे पुरस्कार मिळाले आहेत. मुंबई इंटरनॅशनल कल्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये सुद्धा 'खिसा' ने सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता हे पुरस्कार मिळवले आहेत. मार्च २०२१ मध्ये इस्तम्बूल येथे होणाऱ्या आय एफ ए च्या वार्षिक लाईव्ह स्क्रीनिंग मेळाव्यात प्रतिष्ठित अशा 'गोल्डन स्टार' पुरस्कारासाठी सुद्धा ही फिल्म पात्र ठरली आहे .

दिग्दर्शक राज प्रीतम मोरे म्हणतात, 'खिसा' हे कथा देशाच्या सामाजिक वातावरणावर आणि खेडेगावातील आजही संकुचित असणाऱ्या दृष्टिकोनावर भाष्य करते. महाराष्ट्रातील एका लहान गावात इतर मुलांच्या खिशापेक्षा मोठा खिसा शिवून घेणाऱ्या मुलाची खिशात न मावणारी कथा म्हणजे 'खिसा'. ही मन हेलावून टाकणारी कथा आहे. या शॉर्टफिल्म मध्ये कैलास वाघमारे, मीनाक्षी राठोड, श्रुती मधीदीप, डॉ. शेषपाल गणवीर आणि वेदांत श्रीसागर यांच्या भूमिका आहेत .

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# निरपेक्ष क्रीडाप्रेमी हरपला



सुहास बेंगिरी

गेली अनेक वर्षे पार्ल्यातील विविध क्रीडा प्रवाहांशी, उपक्रमांशी निगडित असलेले, खेळांवर नि:सीम प्रेम करणारे **सुहास बेंगिरी** ह्यांचे ४ डिसेंबर रोजी दु:खद निधन झाले.

सर्वच खेळांमधे प्रचंड इंटरेस्ट असणारा सुहास कॉलेजपासूनच लोकप्रिय होता. कुठल्याही खेळाची कितीही जुनी आकडेवारी या पठ्ठ्याला तोंडपाठ असायची. जगात कुठेही सुरू असलेल्या मॅचचा लेटेस्ट स्कोअर तोच आम्हाला सांगायचा.

२००३ साली '**आम्ही पार्लेकर**'ने '**पार्लेकर चॅनल**' सुरु केला व त्यात सामाजिक व सांस्कृतिक विषयांबरोबर '**क्रीडा**' हा विषयसुद्धा समाविष्ट करण्याचे ठरले. त्या आधी १९९४ साली '**आम्ही पार्लेकर**'च्या पुढाकाराने उपनगरातील पहिलेच सिझन क्रिकेट प्रशिक्षण केंद्र पार्ल्यात सुरु झाले होते व त्यानंतर काही वर्षात डॉ. रमेश प्रभू याच्या प्रयत्नांनी प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल अस्तित्वात आले होते. पार्लेकर चॅनलच्या माध्यमातून ह्या व इतर उपक्रमांना प्रसिद्धी मिळत होती. पार्ल्यात हळूहळू खेळांना पोषक वातावरण निर्माण होत होते.

ह्याच सुमारास चॅनलच्या क्रीडा विभागात सुहास रस घेऊ लागला आणि अल्पावधीतच त्याने अनेक क्रीडाविषयक कार्यक्रमांची बांधणी केली. प्रशिक्षण, सुविधा, स्पर्धेतील सहभाग ह्यावर चर्चा घडवून आणल्या. अभ्यासाप्रमाणे खेळाचेही मुलांच्या जडणघडणीत तेव्हढेच महत्व असते हे तो जाणून होता. खेळांबरोबरच त्याने खेळाडूंना व प्रशिक्षकांना सुद्धा लोकप्रिय केले. पार्ले उपनगर शिक्षणासाठी व सांस्कृतिक उपक्रमांसाठी प्रसिद्ध होतेच पण त्याचबरोबर ते '**क्रीडानगरी**' म्हणून सुद्धा नावारुपास यावे हे सुहासचे स्वप्न होते. पार्ल्यातील जवळ जवळ सर्वच क्रीडा उपक्रमांना सुहासची निरपेक्ष मदत असे. गेल्या ३० वर्षात '**आम्ही पार्लेकर**'ने अनेक क्रीडाविषयक उपक्रमांना, खेळाडूंना, प्रशिक्षकांना लोकांसमोर आणले, अनेकांना पुरस्कार दिले, काहींना मदत मिळवून दिली, ह्याचे मुख्य श्रेय सुहासच्या अथक परिश्रमांना व त्याच्या क्रीडाप्रेमाला जाते.

सुहासचे वडील संगीतप्रेमी होते. त्यांच्या संगीतसेवेमुळे पार्लेकर त्यांना '**रसिक शिरोमणी**' म्हणून ओळखत असत. सुहासचे क्रीडाप्रेम व त्याची क्रीडासेवा त्याच जातकुळीची होती. पार्ल्याच्या ह्या '**क्रीडा शिरोमणी**' च्या अकाली जाण्याने पार्ल्याच्या क्रीडाविश्वाचे अपरिमित नुकसान झाले आहे ह्यात शंका नाही.

**ज्ञानेश चांदेकर**

